## प्रकरण तिसरे

# तात्यासाहेब कोरे व वारणा दुग्ध प्रकल्प

✲ प्रकरण तिसरे ✲

# तात्यासाहेब कोरे व वारणा दुग्ध प्रकल्प

**प्रस्तावना :-**

वारणा परिसरातील शेतकरी, शेतमजूर व इतर आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जनतेचा आर्थिक कायापालट करण्याचे स्वप्न तात्यानी मनाशी बाळगले होते, त्यासाठी त्यांनी प्रथम वारणा सहकारी साखर कारखाना, वारणा विभाग शिक्षण मंडळ, वारणा बँक, वारणा सहकारी कोंबडी संघ, श्री वारणा विभाग सहकार्य संवर्धक मंडळ इत्यादी संस्था स्थापन केल्या होत्या. तात्यासाहेबांच्या कार्याचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील गरीबी नष्ट करणे होय, पण ग्रामीण भागात शेती हाच मुख्य व्यवसाय होता, आणि आजही आहे. भारतीय शेती ही पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीतून वर्षाअखेर निश्चित फायदा होईल हे सांगणे कठीण आहे. काहीवेळा तर शेती पूर्णपणे तोट्यात असते. याचे मुख्य कारण म्हणजे पावसाच्या पाण्यावर शेती हे होय. ज्या ठिकाणी साखर कारखाने निघाले आहेत त्या ठिकाणीही ५०% पेक्षा जास्त जिरायत शेती आहे. आज महाराष्ट्रात अनेक भाग असे आहेत की, साखर कारखान्याला आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेरील ऊस आणावा लागतो, त्यामुळे आपल्या भागात कारखाने निघून सुद्धा शेतकऱ्यांच्या जीवनमानांत फरक पडला नाही, याचा अर्थ असा नाही की साखर कारखाने काढू नयेत. साखर कारखाने हे आवश्यक आहेतच पण बागायत शेतकऱ्यांना कारखान्याचा फायदा होतो. पण ज्या शेतकऱ्यांची जमिन जिरायत आहे त्यांना कारखान्यापासून फारसा फायदा होत नाही. म्हणून बागायत शेतकरी व जिरायत शेतकऱ्यांना समान व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय आहे.

तात्यासाहेब कोरे हे वारणा परिसरात १९५४ पासून पूर्ण वेळ सामाजिक काम करत होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक व्यवसाय चालू झाले होते, अनेक अडचणींवर तात्यासाहेब मात करून आपला प्रत्येक व्यवसायात आदर्श निर्माण केला होता. तात्यासाहेबांनी १९६४ मध्ये जगातील अनेक सुधारलेल्या देशांना भेटी दिल्या तेव्हा त्यांना शेती मालाच्या उत्पादनाबरोबरच दुग्धोत्पादन, कोंबडी पालन, वराह पालन असे अनेक शेती व्यवसायाशी सलग्न धंदे तेथील शेतकरी करताना दिसून आले. त्या देशातील शेती मोठी व शेतमालाचे भावही बांधलेले, असे असूनसुद्धा तेथील शेतकऱ्याना जोड-धंद्याचे महत्त्व कळले होते. "तेथील एकूण उत्पन्नापैकी ६२% उत्पन्न जोड धंद्यातून व ४०% उत्पन्न शेतमालातून अशी तेथील परिस्थिती पाहिल्यावर जोड धंदा कशाला म्हणावे हा प्रश्न निर्माण होईल."[१] आपल्याकडील शेतील जोड धंद्याचे महत्त्व उलट जास्तच आहे. कारण आपली शेती लहान आहे. त्यातील ८०% शेती पावसावर अवलंबून आहे. शेतमालाचे भावही अनिश्चित त्यामुळे वारणा खोऱ्यातील सर्व शेतकऱ्यांना विशेषत: जिरायत शेतकऱ्यांसाठी शेतीला किफायतशीर जोड धंदा देऊन, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तात्यासाहेबांच्या मनात विचार येऊ लागला. तात्यासाहेबांचा एकूण स्वभाव असा होता की, कोणताही व्यवसाय सुरू करण्यास थोडा वेळ लागला तरी चालेल. पण तो व्यवसाय सुरू केल्यानंतर कोणत्या अडचणी येतील. याची प्रथम दक्षता कशी घ्यावी, कोणकोणते प्रश्न उभे राहतील याचा अंदाज करून हे प्रश्न कसे सोडविता येतील याचा विचार तात्या प्रथम करत असत.

याच सुमारास तात्यांचे मित्र माननीय ना. आण्णासाहेब शिंदे यांनी गुजराथमधील सुप्रसिद्ध आनंद येथील सहकारी दुग्धालयाच्या धर्तीवर एक प्रकल्प वारणा विभागात सुरू करण्याचा सल्ला दिला. याच काळात नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष, सहकारी चळवळीचा गाढा अभ्यास असणारे मा. धनंजयराव गाडगीळ, त्यावेळचे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांनी ही कल्पना उचलून धरली व मदतीचे आश्वासन दिले. वारणा विभागात दूध संघ उभा करावयाचा तर फक्त ग्रामीण भागातील दूध संकलन करून ते शासनाला पुरविणे अशा स्वरूपाची ही योजना न ठेवता उत्पादनापासून ते विक्रीपर्यंत सर्व अंगांचा विचार करून, त्यात सुधारणा करण्याचे मुलभूत कार्य करण्याचे ठरविले. तात्यासाहेबांचा मूळ पेशा हा व्यापारी असल्यामुळे प्रत्येक उद्योगधंदा हा व्यवसाय म्हणून करावयाचा. कोणत्याही व्यवसायात वजाबाकी व भागाकार यांना पद्धतशीरपणे विसरून फक्त बेरीज व गुणाकाराचाच उपयोग केला. 'उत्कृष्ठ' किंवा इंग्रजीत ज्याला Excellence म्हणतात. त्याचा तात्यासाहेबांना कमालीचा शोक '१ ला नंबर' हा त्यांचा आवडीचा शब्द. आपल्या संस्था नावापुरत्या चालविणे हे त्यांच्या स्वभावाला पटत नाही. गुणवत्तेत त्या वरच्या क्रमात गणल्या जाव्यात हा आग्रह ते धरत असत.[२] ग्रामीण भागातील दुग्धोत्पादनाचे चित्र पाहिले तर त्याला व्यवसाय म्हणण्याचे धाडस होत नाही. कारण दिवसाला सरासरी ३/४ लिटर दूध देणाऱ्या व आठ दहा महिने भाकड राहणाऱ्या म्हशी आहेत. त्यामुळे यात सुधारणा करून जास्त दूध देणाऱ्या म्हैशी पाळल्या पाहिजेत तसेच संकरित गाईंची वाढ केली पाहिजे तरच हा व्यवसाय फायद्याचा ठरेल.

वरील सर्व गोष्टींचा विचार करून वारणा विभागात दूध संघाची गरज लक्षात घेऊन वारणा साखर कारखान्यापासून जवळच दूध संघाची जागा निश्चित केली. २० जुलै १९६८ रोजी श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ या नावाची सहकारी संस्था स्थापन करण्यात आली. नंतर ५ जानेवारी १९७० रोजी कार्यक्षेत्रातील दूध संकलन कार्यक्रम त्यावेळचे महाराष्ट्राचे सहकार मंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते सुरू केले. वारणा दूध संघाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा, हातकणंगले आणि सांगली जिल्ह्यातील शिराळा, वाळवा तालुक्यात असून हे कार्यक्षेत्र प्रामुख्याने वारणा

नदी काठच्या ६६ गावात पसरले होते, त्यात काही काळानंतर बरेच प्रयत्न करून कार्यक्षेत्रात वाढ झाली आहे.

वारणा दूध संघाच्या कार्यक्षेत्राला सर्वदृष्टीने सोयीस्कर आणि कमी अंतरावर असलेल्या कोल्हापूर येथील सरकारी दूध योजनेला, दूध पुरविण्याचे ठरविले होते. परंतु योजनेची दूध प्रक्रिया करणारी यंत्रसामुग्री लहान असल्याने तेथे दूध मोठ्या प्रमाणावर शिल्लक राहू लागले. म्हणून वारणेचे दूध मिरज येथील योजनेला पुरवावे असे शासनाकडून सांगण्यात आले. पुढे बरीच वर्षे वारणा दूध संघाने मिरजेला दूध पुरवठा केला. मिरज व वारणा ही दोन्ही ठिकाणे तशी थोडी लांबच असल्यामुळे आणि वारणा दूध संघ बाल्यावस्थेत असल्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढला, शासकीय बिले मिळावयास झालेला विलंब, वाटेत दुधाची होणारी भिन्न प्रकारची हानी इ. अनेक प्रश्न उभे होते. पण या मार्गाला कोणताच इलाज नसल्यामुळे त्याच मार्गाने वाटचाल करणे भाग पडत असे.

"१९६९-७० या वारणा दूध संघाच्या स्थापनेच्या दुसऱ्या वर्षी संघाची 'अ' वर्ग उत्पादक संख्या ८१२ इतकी होती. संस्था सभासद संख्या दोन होती. या दुसऱ्या वर्षीच सात लाख, अकरा हजार नऊशे पस्तीस लिटर दुधाचे संकलन करण्यात आले. संघाची स्थापना चार लाख, अकरा हजार चारशे पंचेचाळीस रूपये भागभांडवल गोळा करून झाली. इतक्या मोठ्या भागभांडवलावर सुरू होणारी सहकारी दुग्ध संस्था, महाराष्ट्र राज्यात तरी वारणा ही पहिलीच असावी."[१] तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था चांगल्या प्रकारे काम करित होती. तसेच वारणा दूध संघाला त्यावेळचे केंद्रीय अन्न आणि कृषि राज्यमंत्री माननीय ना. आण्णासाहेब शिंदे यांनी या दूध प्रकल्पला चांगली मदत केली. या ठिकाणी एक नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे मा. तात्यासाहेब कोरे हे दूधसंघाचे संस्थापक होते. दूध संघाचा कारभार हा त्यांच्या विचाराने चालत होता. प्रत्येक गोष्टीचा तात्या विचारपूर्वक निर्णय घेत होते. परंतु ज्या पद्धतीने ते वारणा सहकारी साखर

कारखान्याचे ते स्वत: अध्यक्ष (चेअरमन) होते. त्या पद्धतीने दूध संघाचे नव्हते. जरी ते स्वत: अध्यक्ष नसले तरी तो दूध संघ त्यांना वारणा सहकारी साखर कारखान्याइतकाच जवळचा होता. दूध संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहणारे, व तात्यांच्या ग्रामीण विकासात त्यांच्या बरोबरीने काम करणारे त्यांचे बंधू दिनकर तथा नानासाहेब कोरे यांनी भरीव कार्य केले. तसेच काही काळ अध्यक्ष म्हणून श्री. ज. बा. तथा अण्णासाहेब पाटील हे काम पाहत होते. पण दूध संघाची वाटचाल ही तात्यांच्या विचारानुसारच होती.

तात्यांच्या एकूण कामावर अनेक शासकीय अधिकाऱ्यांचा विश्वास बसला होता. कारण या भागात कारखाना, बँक, कोंबडी संघ इ. अनेक व्यवसाय मोठ्या धाडसाने सुरू करून ते यशस्वी करून दाखविले होते. तसेच दूध संघसुद्धा चालवताना अनेक अडचणी येत होत्या. परंतु प्रत्येक अडचणीवर मात करणे हे तात्यासाहेबांना आता अंगवळणी पडले होते. त्यामुळे शासकीय अधिकारी सुद्धा एखादे वारणे संदर्भात प्रकरण मंजूर करण्यास धाडस दाखवित होते. अर्थात ते कायदेशीर मार्गानेच. तात्यासाहेब प्रत्येक काम करताना कायदा कोठे आपण मोडणार नाही, यांची दक्षता घेत होते. म्हणून तात्यासाहेबांचे गुरूतुल्य मित्र रत्नापाण्णा कुंभार म्हणत की, तात्यासाहेबांनी अनेक उद्योगधंदे, शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. परंतु कोणत्याही संस्थेत गैरकारभार दिसून येत नाही. म्हणून ते म्हणतात, ‘‘मासा पाण्यात राहतो पण त्याच्या अंगाला पाणी लागत नाही. तसेच माननीय तात्यासाहेबांचे जीवन अनेक क्षेत्रात विकसित झाले आहे. पण त्या क्षेत्रातील दुर्गुणांचा लवलेशही त्यांच्या जीवन कार्याला शिवलेला नाही. सुगंध सुगंधानी त्यांच्या जीवन कार्याचा सुवास दरवळलेला आहे.’’[४] म्हणूनच वारणा दूध प्रकल्पाच्या उभारणीसाठी, अॅग्रिकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन, सर्व संचालक आणि मुख्य रूद्रमुर्ती तसेच बँक ऑफ इंडियाचे कस्टोडियन माननीय श्री. जे. एन. सक्सेना यांनी वारणा दूध संघाला दुसऱ्याच वर्षी एक कोटी पंच्याऐंशी लक्ष रूपयांचे मोठे कर्ज मंजूर केले. हा कृषि

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

औद्योगिक सहकारी क्षेत्रातील एक इतिहास होय. कारण कोणतेही कर्ज मंजुर करण्यासाठी तारण (गॅरंटी) मागितली जाते. पण त्यावेळी वारणा दूध संघाला महाराष्ट्र शासनाकडून अशा प्रकारची गॅरंटी मिळणे कठीण झाले. ''त्यावेळी श्री रूद्रमुर्ती आणि श्री. सक्सेना यांना सर्व वस्तुस्थिती समजावून घेण्यासाठी प्रत्यक्ष वारणानगरला या, आत्तापर्यंत केलेली सर्व कामे पहा, आणि आमच्या कर्तृत्वशक्तीवर विश्वास बसला तरच आम्हाला दूध प्रकल्पसाठी कर्ज मंजूर करा. अशी तात्यासाहेबांनी नम्रपणे विनंती केली.''[५] श्री. रूद्रमुर्ती आणि श्री. सक्सेना यांनी तात्यासाहेबांच्या विनंतीला मान दिला आणि ते वारणानगरला आले. दुग्ध प्रकल्पाचे सामाजिक आणि राष्ट्रीय महत्त्व ओळखून शासनाच्या तारणाशिवाय एक कोटी पंच्याऐंशी लक्ष रूपये एवढे मोठे कर्ज दिले. शासनाच्या औपचारिक तारणाशिवाय मंजुर झालेले, अखिल भारतातील हे पहिलेच उदाहरण होते.

वारणा दुग्ध प्रकल्पाचा मूळचा आराखडा एकूण दोन कोटी, एक्कावन्न लक्ष रूपयांचा होता. या खर्चासाठी अग्रिकल्चरल फायनान्स कॉर्पोरेशनने एक कोटी पंच्याऐंशी लक्ष रूपयांच्या एकूण कर्जास मान्यता दिली होती. या वारणा दूध उत्पादकांचे आशास्थान म्हणजे वारणा दुग्ध प्रकल्पातील 'अमृत' दुग्धालयाची अतिशय सुंदर व रेखीव इमारत. या इमारतीची कोनशीला मा. जगदीश सक्सेना, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, बँक ऑफ इंडिया यांच्या शुभ हस्ते ४ जून १९७३ ला बसविण्यात आली. ही इमारत त्यावेळी १२ लाख रूपये खर्च करून बांधली. या इमारतीत दूध स्वीकारणे, त्याचे वजन करून प्रतवारी ठरवणे, कॅन्स धुणे, दूध थंड करणे, क्रीम काढणे, दूधावर प्रक्रिया करणे इ. सोय या इमारतीत करण्यात आली. वारणा दूध संघाचा व्याप वाढत जाऊ लागला तसे, या इमारतीमध्ये काही भाग वाढविण्यात आले. तसेच या दुग्धालयाशेजारी भांडाराची इमारत, पाणी पुरवठा, विज व्यवस्था, निवासस्थाने बांधून सन १९७५ पर्यंत पूर्ण झाली. दूध संघाचा व्याप वाढतच होता. भांडवल वाढविण्याची गरज होती. त्यासाठी

तात्यासाहेबांनी कांही योजना हाती घेतल्या. त्यामध्ये प्रकल्पाचे भांडवल वाढविण्यासाठी लिटर मागे पाच पैसे शेअर अमानत/ठेव घेतली. तसेच जादा वाहतूक वगैरे खर्चासाठी लिटरमागे पाच पैसे देण्याची योजना आखण्यात आली. तसेच कर्ज फिटेपर्यंत लिटरमागे १० पैसे बिनपरतीची ठेव जमा करणे असे उपक्रम चालू केले. हे प्रकल्प दूध संघाच्या दृष्टिने फायद्याचे होते. तसेच दूध उत्पादकांनाही कांही संकटाच्यावेळी मदत करण्यासाठी योजना आखण्यात आल्या. त्या म्हणजे दुभती जनावरे आकस्मिकरित्या अगर आजाराने मयत झाल्यास दूध उत्पादकांना फारच तोटा होतो. यासाठी संघाने सुरक्षानिधीची सोय केली. दुभत्या जनावरांचे विमे करण्याची सोय तात्यांनी करून दिली.

सुरवातीच्या काळात वारणा दूध संघ अडचणीत होता. त्यावेळी तात्यासाहेब व दूध संघाचे इतर संचालक मंडळ दूध उत्पादकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी प्रयत्न करत होते. त्यांच्या बरोबरीने वारणा दूध संघाचे पहिले कार्यकारी संचालक श्री. रा. कृ. ठकार हे काम पहात होते. मुळात ते बृहनमुंबई दूध योजनेचे सहसंचालक म्हणून काम करत होते. पुढे त्यांनी वारणेचे एकूण काम पाहिले व तात्यांच्या आग्रहाखातर शासनाच्या सेवेतून स्वेच्छा निवृत्त होण्याचे त्यांनी ठरविले. शासनातील उच्च अधिकाराच्या जागेची इच्छा न बाळगता त्यांनी सामाजिक बांधिलकी स्वीकारली. त्यांच्या ज्ञानाचा वारणा दूध संघाला खूप फायदा झाला. त्यांच्या कल्पक ज्ञानाचा उपयोग वारणा दूध संघाला झाला. त्यांच्या कल्पक ज्ञानाचा उपयोग वारणा दूध संघाने दूधावरील प्रक्रियेस प्रारंभ केला. आज या दूध संघाचे निरनिराळे पदार्थ संपूर्ण देशभर तसेच काही परदेशात आवडीने खाऊ लागले आहेत. तसेच वारणेच्या दूध पदार्थांना दिवसेंदिवस मागणी वाढू लागली आहे. त्यांचा फायदा वारणेला दूध पुरवठा करणाऱ्या शेतकरी वर्गाला होतो. संघाने नेहमीच दूध उत्पादक हा केंद्रबिंदू मानून काम केले आहे.

वारणा दूध संघाचा दूसरा कालखंड खऱ्या अर्थाने १९७६ पासून सुरू होतो. कारण पहिल्या कालखंडात म्हणजे दूध संघ सुरू झाल्यापासून ते १९७५ पर्यंत दूध संघ केवळ दूध संकलन करून ते शासकीय दूध योजनेला पुरवठा करत होते. पुढे अमृत दुग्धालयात दोन ऑक्टोबर १९७६ पासून दुधावरील प्रक्रियेस आणि अकरा नोव्हेंबर १९७६ पासून दूध भुकटी आणि तुपाची निर्मिती यांना सुरवात केली. त्यामुळे वारणेने शासकीय दूध योजनेला दूध पुरविण्याचे बंद कले आणि आपल्या दूधावर प्रक्रिया सुरू केली. याच काळात कोल्हापूर आणि मिरज येथील शासकीय दुग्धालयात क्षमतेपेक्षा जास्त दूध पुरवठा होऊ लागला. त्यामुळे शासनाने सातारा जिल्हा दूध संघ, जावळी तालुका दूध संघ, तसेच इतर काही दूध संघाना वारणा दुग्धालयास दूध पुरविण्यास सांगितले. वारणा दूध संघानेही त्यांचे दूध स्वीकारून घेतले. आणि या दूधावरही प्रक्रिया आणि पदार्थ निर्मिती करून त्या दूध संघाना पर्यायाने शासनाला मदत केली. त्यावेळी वारणा दूध संघ नसता तर हजारो दूध उत्पादकांचे दूध स्वीकारले नसते तर लक्षावधी रूपयांचे नुकसान झाले असते, हे नुकसान वारणा दूध संघाने वाचविले म्हणून, त्यावेळेचे दुग्ध व्यवसाय विकास खात्याचे महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. नामदार सुंदरराव सोळंके आणि नामदार शंकरराव बाजीराव पाटील यांनी दूध संघाच्या कामाबद्दल प्रसंगोद्गार काढले आणि ह्या 'दूध संघाला मदत करणे हे पुण्यकर्म आहे' असे भावपूर्ण उद्गार काढले. बाहेरील दूध संघाचे दूध वारणेने स्वीकारल्यामुळे वारणेच्या दूध संघालाही क्षमता होती त्यामुळे जादा होणाऱ्या दूधावर प्रक्रिया करणे भाग पडले. त्यातून लोणी तयार करण्याचे यंत्र पूर्व जर्मनीहून आले असे एक-एक दूधापासून उपपदार्थ तयार करण्याची यंत्रे वारणेला येऊ लागली आणि त्यातूनच या संघाला भरभराटी येऊ लागली.

वारणा दूध संघाने फक्त दूध प्रक्रिया करून पदार्थ निर्मितीला सुरूवात केली नाही, तर शासनाने ठरवून दिलेले लक्षही पूर्ण केले. पदार्थ निर्मितीच्या दुसऱ्या हंगामातच ६२० टन दूध पावडर आणि ४८० टन तूप हे उद्दिष्ट पूर्ण केले. दूध संघाला

जास्तीत-जास्त फायदा होण्यासाठी संघाची स्वत:ची विक्री योजना सुरू करण्याचा प्रयत्न होता. परंतु आर्थिक अडचणींमुळे ही योजना पूर्ण होऊ शकली नव्हती. १९७८-७९ मध्ये बँक ऑफ इंडियाने या योजनेकरिता सहा लाख बासष्ट हजार रूपये कर्ज मंजूर केले. त्यामुळे या योजनेला तेथून पुढे गती आली. "त्याच वर्षी दूध संघाने मुंबई उपनगर यामध्ये 'अपना बझार' या संस्थेमार्फत दि. ३१ जुलै १९८० पासून दूध विक्री व्यवस्था चालू केली. तळोज इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये 'अपना बझार' मसाला आणि लोणची तयार करावयाच्या फॅक्टरीत, आवश्यक ती जागा घेऊन तिथे फिलपॅक मशिन बसविले. या मशिनरीमधून अर्धा किलो, एक किलो दूध समाविष्ठ असलेल्या प्लॅस्टिक पिशवी बंद स्थितीत तयार होत. त्याचा वेग साधारण मिनिटास चाळीस पिशव्यापर्यंत असे. याप्रमाणे तीन हजार लिटर दुधाची मिनिटास प्रतिदिनी विक्रीव्यवस्था झाली."[६] याखेरीज संघाने सुगंधी दुध विक्री व्यवसाय चालू केला. हे दूध कोल्हापूर आणि इचलकरंजी येथे विक्रीसाठी पाठविण्यात आले.

वारणा दूध संघाचा केंद्रबिंदू हा दूध उत्पादक आहे. त्यामुळे दूध उत्पादकांकडून जास्त दूध निर्मिती होण्यासाठी गाई-म्हैशी यांना खाद्याची गरज भासू लागली. तसेच दूध संकलन करणाऱ्या सर्व संस्थांची पशुखाद्याची मागणी लक्षात घेऊन १९८० सालापासून वारणा दूध संघाने निरनिराळ्या कंपन्यांशी वाटाघाटी करून ज्या दूध उत्पादकांना ज्या कंपनीचे पशुखाद्य आवश्यक आहे. त्या-त्या कंपनीचे पशुखाद्य कंपनी दरात प्राथमिक सोसायटीचे ठिकाणी संघामार्फत पोहोचविण्यास सुरूवात झाली. तात्यासाहेब हे उपक्रमशील नेतृत्त्व असल्यामुळे प्रत्येक दूध संकलन करणाऱ्या सोसायट्यांना मोठ्या प्रमाणात पशुखाद्य लागते तर ते आपणच निर्माण करावे. यासाठी त्यांनी त्यासंदर्भात सखोल माहिती घेतली व वारणा दूधसंघानेच पशुखाद्यनिर्मितीची फॅक्टरी उभारावी असा निश्चय केला आणि तो पुढे पूर्ण केला.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पुशखाद्याबरोबरच दूध उत्पादकांना पशुवैद्यकीय सेवा अधिक प्रमाणावर उपलब्ध करून देण्यासाठी संघाने लक्ष घातले. दूध संघामार्फत पशूंची काळजी कोणकोणत्या प्रकारे घ्यावयाची, संकरित गाईंची वाढ करणे, जास्त दूध देणाऱ्या म्हैशी पाळणे दूध धंद्याकडे व्यवसाय म्हणून पाहणे इ. माहिती पशुअधिकाऱ्यांकडून दिली जाऊ लागली. तसेच दूध संघामार्फत निरनिराळ्या दिवशी निरनिराळ्या मार्गावरील (रूट) ठरवून देवून त्या-त्या दिवशी हे पशुवैद्यकीय जातात. त्यामुळे जनावरांचा भाकड काळ कमी होऊ लागला आणि दूध काळ जास्त ठरू लागला. पशूंच्या आजाराचे प्रमाण कमी झाले. पर्यायाने दूध उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या संपूर्ण संघावर देखरेख तसेच कामगार, अधिकारी यांना मार्गदर्शन करण्याचे काम १९८० पासून सी. एन. गुळवे करतात. १९८० ते आजपर्यंत दूध संघाचे कार्यकारी संचालक म्हणून ते काम करत आहेत. त्यांना सामाजिक कर्तव्याची जाण असल्यामुळे तसेच प्रभावी कार्यकुशलता यामुळे दूध संघाला भरभराटी आली आहे. देशातील एक नामवंत दूध संघ असून त्याची कीर्ती त्रिखंडात पसरली आहे.

१९८० पर्यंत वारणा दूध संघ सरसकट दुध स्विकारत होता. पण नंतर ह्या पद्धतीत बदल करून आनंद पद्धतीच्या नवीन सुधारित दूध संकलन करण्याची पद्धत स्वीकारली. ह्या दूध संकलन पद्धतीचा फायदा संघाला जाणवू लागला. उत्पादकांचे दूध सोसायटी पातळीवरच तपासले जाऊ लागले. दूधाच्या प्रतीप्रमाणे (फॅट) त्यांना दर मिळू लागला. त्यामुळे प्रामाणिक दूध पुरवठ्याला योग्य भाव मिळू लागला. दूध तपासणीसाठी संघामार्फत ॲसिड व अल्कोहोल मोफत पुरविले. ही पद्धत योग्य रित्या राबविण्यासाठी संघामार्फत प्रशिक्षण देण्यात आले. दूध सोसायट्यावर दूध तपासण्याची प्रक्रिया सुरू केली त्यामुळे दूधाचा दर्जा वाढला. वारणेचे दूध हे उच्च प्रतीचे आहे असे विक्री केंद्राला ग्राहक कळवू लागला. त्यामुळे मुंबई तसेच इतर शहरातही वारणेच्या दूधाला मागणी वाढू

लागली. १९८१-८२ पासून मुंबई येथे खुल्या बाजारात विक्री सुरू केली. मुंबईतील ग्राहकांना 'वारणा फॅमिली होल मिल्क' हे अत्यंत आवडले. तसेच वारणा अद्ययावत दुग्धालयात तयार केलेले तूप, पावडर, श्रीखंड पदार्थ लोकप्रिय होत गेले. अपेक्षे पेक्षा जास्त विक्री झाल्यामुळे वारणा दूध पॅकिंग युनिट 'अपना बझार' च्या तळोजा येथून हलवून तुर्भे येथील मॅफ्कोच्या कोल्ड स्पेअरच्या इमारतीत आणले तेथे श्रीखंड, बासुंदी इत्यादी दुग्ध पदार्थांचे उत्पादन सुरू केले. त्याच वारणेच्या श्रीखंडाने अनेक विक्रम आज प्रस्थापित केले आहेत. आज ग्राहक इतर कोणत्याही श्रीखंडापेक्षा वारणेच्या श्रीखंडाला प्रथम क्रमांक देतात. असे होलसेल विक्री करणारे व्यापारी सांगतात. वारणेच्या तूपाला तर 'अॅगमार्क' मिळाला होता. तूपाची विक्री वाढण्याकरिता एक बक्षीस योजना जाहिर करण्यात आली. त्यालासुद्धा फार मोठा प्रतिसाद मिळाला.

तात्यासाहेबांच्या नेतृत्त्वाखाली वारणा दूध संघाची घोडदौड चालू होती. वारणेचे दूध तसेच इतर पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात होत होती. पण संघाचे स्वत:चे दूध संकलन वाढल्याशिवाय गत्यंतर नव्हते. दूध संकलन वाढीचा अपेक्षित वेग न वाढण्याला चांगल्या जातीची जनावरे नसणे, हिरव्या वैरणीचा अभाव, पारंपारिक पद्धतीने जनावरांची हाताळणी, पशुवैद्यकीय सेवेची कमतरता या गोष्टी दूध संकलन न होण्यास कारणीभूत होत्या. म्हणून दूध संघाने जास्त दूध देणाऱ्या सुरती, मेहसाना, पंढरपुरी इ. चांगल्या जातीच्या म्हैशी संघाच्या साईटवर देण्याचा उपक्रम सुरू केला. संघाच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून निवडून आणलेल्या चांगल्या म्हैशी संघाने ना नफा ना तोटा या तत्त्वावर शेतकऱ्यांना दिल्या. तसेच हिरव्या वैरणीसाठी सुबाभुळ सारख्या कमी पाण्यावर येणाऱ्या वनस्पतींची निवड करण्यात आली. तसेच वारणा दूध संघाचे कार्यक्षेत्र, वारणा सहकारी साखर कारखान्याइतकेच म्हणजे ६६ गावांपुरतेच होते. ही गावे पन्हाळा, हातकणंगले, वाळवा, शिराळा या तालुक्यातील होती. या तालुक्यातील एकूण २७५

गावाचे वाढीव कार्यक्षेत्र मिळावे असा संघाने सातत्याने आग्रह धरला आहे. 'वारणा दूध जिल्हा' निर्माण व्हावा असा आग्रह धरला. महाराष्ट्र शासनाने याचा जी. आर. काढला. पण शासनाकडून अंमलबजावणी झाली नाही. १९८२-८३ यावर्षी संघाला १५ वर्षे पूर्ण झाली. तरीसुद्धा शासनाने संघाला वाढीव कार्यक्षेत्र मिळाले नाही. तसेच संघ वेळोवेळी अडचणीत असताना शासनाकडून फारशी मदत मिळाली नाही. दुग्धपदार्थ उत्पादन करताना शासनाने उत्पादन खर्च लक्षात घेऊन संघास दर दिले नाहीत. शिवाय मंजूर केलेले दराची बिलेही वेळेवर दिली नाहीत.

संघाची अर्थव्यवस्था नाजूक असताना शासनाने मदत करणे गरजेचे होते. पण संघाला कोणतीच मदत केली नाही. हे तात्यासाहेब सांगत होते, वेळप्रसंगी शासनावर टिकाही करत असत, याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे तात्यासाहेब केवळ ग्रामीण विकासाचे स्वप्न पाहत होते. त्यांना राजकारण करावयाचे नव्हते. आमदार, मंत्री व्हावयाचे नव्हते, केवळ आपल्यामुळे ग्रामीण विकास व्हावा. एवढेच त्यांचे लक्ष होते. त्यामुळे शासनावर चुकीच्या ठिकाणी टीका करत असत. जर ते राजकारणात असते तर त्यांना या गोष्टी करता आल्या नसत्या कारण त्यांचा वैयक्तीक स्वार्थ नडला असता. पण त्यांना स्वत:च्या स्वार्थापेक्षा समाजहित महत्त्वाचे होते. संघ चालला आहे तो केवळ एकूण उत्पादनापैकी जवळ जवळ ५०% इतकी विक्री संघ खुल्या बाजारात करीत होता. स्वावलंबी विक्री व्यवस्थेमुळे आशादायक परिस्थितीकडे वाटचाल करीत आहे.

आपल्या देशात म्हैशी व गाई ही दूध देणारी जनावरे असून त्यापैकी म्हैशीच्या दूधाला जास्त मागणी आहे. वास्तविक गाईंचे दूध म्हैशीपेक्षा जास्त प्रमाणात निघते. तीन म्हैशी इतके एक संकरित गाय दूध देते. पण आपल्याकडे गाईच्या दूधाला मागणी कमी आहे. संघाकडे संकलित होणाऱ्या गाईच्या दुधाचा निर्गतीचा प्रश्न भेडसावीत होत. यासाठी वारणा दूध संघाने कॅडबरी इंडिया सारख्या विश्वविख्यात

AKR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

चॉकलेट कंपनीला गाईच्या दूधाचा पुरवठा सुरू केला. त्यामुळे गाईच्या दुधाचा प्रश्न थोड्याफार अंशाने सुटण्यास निश्चित मदत झाली. तसेच मुंबईच्या दुग्ध पदार्थ विक्रीचा व्याप दिवसेंदिवस वाढत जाऊ लागला. त्यासाठी स्वत:ची जागा असणे महत्त्वाचे वाटू लागले. त्यासाठी वारणा दूध संघाने एम. आय. डी. सी., वाशी (नवी मुंबई) येथे जागा खरेदी केली. तसेच दूधापासून निर्माण होणाऱ्या पारंपारिक पदार्थांच्या विक्रीच्या भरवशावर आपण फार काळ तग धरू शकणार नाही हे तात्यांनी ओळखले. यासाठी आधुनिकता आणणे गरजेचे आहे. म्हणून डॉ. रेगे यांच्यासारख्या विख्या संशोधकाला नवीन पदार्थ निर्मिती संबंधीचे संशोधिताचे काम दिले. त्यांनी सात लाख रूपये खर्च करण्याचे ठरविले. वारणा दुध संघाचे मुंबई येथे युनिट उभारणीकरीता भांडवलाची गरज होती. त्यासाठी जास्तीत जास्त सभासद होणत्याकरिता तात्यांनी आवाहन केले. १९८३-८४ मध्ये चौदा लाख सत्तर हजार एकशे शहात्तर रूपये होते. तर त्याच वर्षाअखेरीस एकुण तीस लाख एकवीस हजार रूपयांहून जास्त झाले. एका वर्षात भांडवल दुप्पटीपेक्षा जास्त झाले. आणि ही रक्कम काही दिवसांच्या आत जमा झाली. याचे कारण तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वावर वारणा परिसरातील लोकांचा विश्वास हेच होय. वारणा दूध संघाने वाशी येथे दहा लाख रूपये खर्च करून जागा खरेदी केली.

वाशी येथे वारणा दूध संघाने जर्मनीहून एक होमोजिनायझर साडेचार लाख रूपये खर्च करून आणले. तसेच मुंबईसारख्या शहरात राहण्याचा प्रश्न महत्त्वाचा होता. त्यामुळे वाशी येथे कामगारांसाठी दूध संघाने २४ फ्लॅटस खरेदी केले. तसेच मुंबई येथे कामगारांच्या संपाचा फटका दूध संघाला बसू नये. यासाठी वारणा परिसरातील लोक वाशी या ठिकाणी दूध संघात काम करू लागले. त्यांच्या राहण्याची सोयही झाली. शिवाय कामगार हे वारणा परिसरातील असल्यामुळे दूधसंघाशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. तो संघ आपला आहे. या हेतूने तेथे काम करत होते. याच वर्षी अनेक

वर्षापासून सातत्याने मागणी असलेला वारणा पशुखाद्य कारखानाही काढला. त्याची जाहिरातही करण्यात आली. ती अशी "वारणा खाद्य खाऊ घाला जणावरांना, आर्थिक चणचण भासणार नाही तयांना"[७] ही केवळ जाहिरात नाही, तर उत्तम प्रतीचे समतोल आणि विश्वसनीय पशु आहार आहे. १९८० ते १९८२ च्या दरम्यान वारणा दूध संघाला अनेक अडचणी आल्या. शासनाकडून वेळेवर बिल मिळू शकत नव्हते. त्यामूळे हा दूध संघ काही दिवसांत बंद पडेल अशी अवस्था निर्माण झाली होती. पण तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली अनंत अडचणींवर मात करून दूध संघाने अनेक विक्रम केले. १९८३ पासून दूध संघाने आपली घोडदौड चालू केली ती आजपर्यंत त्यात सातत्याने वाढ होत आहे. त्याचबरोबर अनेक पदके बक्षीसे सुद्धा दूध संघाला मिळाली आहेत.

वारणा साखर कारखान्यात काही निवडणूका वादळी झाल्या. पण दूध संघाच्या निवडणूका कधी झाल्या हे कळलेसुद्धा नाही. कारण दूध संघाने ग्रामीण शेतकऱ्यांसाठी भरीव कार्य केले. बऱ्याच निवडणूका बिनविरोध झाल्या आहेत. तात्यासाहेब कोरे यांचे बंधू नानासाहेब कोरे यांनी दूधसंघाची धुरा यशस्वीपणे पार पाडली होती. ते १९९६ पर्यंत दूध संघाचे अध्यक्ष होते. या दोन बंधूत कमालीची एकता होती. तात्यांच्या मनातील कोणतीही गोष्ट नानासाहेब पटकन ओळखत असत. कारण त्याच्या बरोबरीने अगदी लहान वयापासून कार्य केले होते. १९८४-८५ मध्ये तंत्रज्ञान दौऱ्याकरिता दूध संघाचे नानासाहेब कोरे, ज. बा. तथा अण्णासाहेब पाटील आणि श्री. विलास विश्वनाथ कोरे हे तीन संचालक परदेशी दौऱ्यावर गेले. त्यापैकी दिनकर कोरे व अण्णासाहेब पाटील हे दोघेही दूध संघाचे अध्यक्ष पद भूषविलेले होते. तर विलास कोरे विज्ञाननिष्ठ होते. त्याचा दूग्धोत्पादन क्षेत्रात चांगला अभ्यास होता. ते वारणा दूध संघाचे व्हा. चेअरमन होते. ते स्वत: कृषीपदवीधर होते. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा फायदा दूध संघाला झाला. वरील तीन संचालकांनी अमेरिका, इटली, इंग्लंड, डेन्मार्क इ. देशांना भेटी

देऊन डेअरी तंत्रज्ञान विकसित करण्याची माहिती घेतली. म्हणून अनेक मान्यवरांनी वारणा परिसरात वारणा दूध संघाने 'धवल क्रांती' केली असे उद्‌गार काढले आहेत.

वारणेच्या उत्पादनात दिवसेंदिवस वाढ होत होती. तसेच दूध संघाने घेतलेले कर्ज फेडही होत होती. वारणेच्या दूधापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांच्या संकेतातही वाढ होत होती. वारणा दूध, वारणा दूध भुकटी, तुप, श्रीखंड, आम्रखंड इ. पदार्थ तयार होऊन त्याची विक्री मोठ्या प्रमाणात होऊ लागली. मुंबईतील वारणा दूध संघाच्या प्रतिदिनी विक्री एक लाखापेक्षा जास्त आहे. वाशी, नेरूळ येथे बुथस उभारले आहेत. त्यामुळे वारणेच्या दूधाचा खप दिवसेंदिवस वाढतच आहे. प्रामुख्याने म्हैशीचे दूध विक्रीस उपयोगी पडते, तर गाईच्या दूधापासून इतर पदार्थ तयार केले जातात. १९८६-८७ पर्यंत गाईच्या दूधापासून प्रामुख्याने लस्सीचे उत्पादन करीत होते. पण १९८७-८८ मध्ये वारणा स्प्रे, मँगोजी, स्लमेक्स यासारख्या उत्पादनास सुरवात केली. त्यामुळे गाईच्या दूधाचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागला. वारणा दूध संघाने दूध उत्पादकांना शासनाच्या दरापेक्षा नेहमीच जास्त दर दिला आहे. पण दराच्या बाबतीत दूधसोसायट्यांवरच दूध तपासून ज्या दूधाची जितकी फॅट आहे त्याप्रमाणात दर देत होते. या वाढीव दरापोटी दूध संघाने दूध उत्पादकांना मोठ्या प्रमाणात रक्कम दिली आहे. ती पुढीलप्रमाणे सांगता येईल. त्यासाठी १९८७-८८ ते १९९२-९३ या वर्षांचा अभ्यास करून जादा रक्कम किती दिली हे सहज समजते. हे आकडे लाखात आहेत.

| अ. क्र. | सन | जादा दिलेली रक्कम (रूपये लाखात) |
|---|---|---|
| १ | १९८७-८८ | १७९.८८ |
| २ | १९८८-८९ | २०२.११ |
| ३ | १९८९-९० | १८६.८६ |
| ४ | १९९०-९१ | ३२७.७४ |
| ५ | १९९१-९२ | ४४३.५२ |
| ६ | १९९२-९३ | ३३६.४० |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR


वारणा दूध संघाने वर्षाला वरील दाखविली आहे त्या पद्धतीने शासनाने ठरवून दिलेल्या रक्कमेपेक्षा जास्त दर दिलेला आहे. त्यासाठी काही सालची आकडेवारी दाखविली आहे.

"वारणा दूध संघाच्या नेत्रदिपक प्रगतीमध्ये कर्नाटक सीमा भागातील दूध संकलनाची महत्त्वाची भूमिका आहे. सन १९९२-९३ साली रोजचे दूध १,६८,१०६.० लिटर्स इतके जमा होत होते. त्यापैकी संघाच्या कार्यक्षेत्रातील दूध ८६,०८३.४ तर कर्नाटक सीमा भागातील दूध ८२,०६७.६ इतके होते."[6] म्हणजे वारणेच्या कार्यक्षेत्राइतकेच दूध संघाच्या बाहेरून तसेच इतर काही दूध संकलन केंद्राकडून घेतले जाते. तसेच दिवसेंदिवस या क्षेत्रात स्पर्धा निर्माण होत आहेत. त्या सांगली-कोल्हापूर जिल्ह्यात नवनवीन दूध संघ निर्माण होत आहेत. त्यामुळे त्या दूध संघांशी स्पर्धा करावी लागत आहे. गेल्या कांही वर्षात वारणेच्या आसपास नवीन दूध संघ निर्माण झाले ते म्हणजे मयुर, मोरणा, हुतात्मा (वाळवा) हे तीन्ही संघ वारणेचे मूळचे कार्यक्षेत्र आहे त्याच भागात सुरू झाले आहेत. त्यामुळे मुळात कार्यक्षेत्रातील दूध संघाला कमी पडते त्यात आणखी काही दूध संघ निर्माण झाले असल्यामुळे स्पर्धा जास्त वाढली आहे. याचा अर्थ दूध उत्पादकांना आपले दूध कोणत्या संघाला घालावे असे पर्याय उभे आहेत. त्यामुळे जो दूध संघ उत्पादकांना जास्त सोई देईल. तो संघ या स्पर्धात टिकून राहिल अन्यथा संघ तोट्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पण तात्यासाहेबांनी जे आदर्श घालून दिले आहेत ते व्यवस्थित पाळावे लागणार आहेत. तरच दूध संघ यशस्वी होऊ शकेल. असे असले तरी वारणा दूध संघाने आजपर्यंत अनेक अडचणींना तोंड दिले आहे.


वारणा दूध संघाने स्थापनेपासून आपल्या दूध उत्पादनात कशी वाढ केली आहे त्याचा अभ्यास करून त्याचा आलेख दर्शविला आहे. जरी स्पर्धा असली तरी

दूध उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या सवलती, मदत इत्यादी गुणांमुळे अनेक दूध संघ निर्माण झाले तरी वारणेला दूध पुरवठा करणाऱ्या उत्पादकांत काही फरक पडला नाही. कारण त्यांचा दूध संघावरील अढळ विश्वास आहे. वारणा दूध संघ १९६८ साली सुरू झाला असला तरी पहिले वर्ष इतके महत्त्वाचे गणले नाही.

पुढील पानावरील आलेखात दूध संकलनात कशा पद्धतीने वाढ झाली आहे हे दर्शविले आहे. त्यासाठी पाच-पाच वर्षांचा कालावधी घेतला आहे.



दूध संकलन (लिटर्स लाखात)
७००
६००
५००
४००
३००
२००
१००
०
७.१२
६५.८
९०.२३
२६८.५३
५६७.५३
६१३.५९
१९६९-७०
१९७१-७५
१९७५-८०
१९८४-८५
१९८९-९०
१९९२-९३
१९६९-
७०
१९७१-
७५
१९७५-
८०
१९८४-
८५
१९८९-
९०
१९९२-
९३




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

अशा पद्धतीने वारणेच्या दूध संकलनात दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्या पद्धतीने दूधात वाढ होत आहे. त्याच पद्धतीने दूध पदार्थातही वाढ होत आहे. दूध साठविण्यासाठी बर्फ आवश्यक असतो. तो निर्माण करण्याचा कारखाना दूध संघाने स्थापन केला आहे. तात्यांनी दूग्ध प्रकल्पात भरीव कार्य केल्याबद्दल कै. वसंतराव नाईक कृषि प्रतिष्ठानचे दुग्धव्यवसाय विकास हे उच्च सन्मानाचे पारितोषिक तात्यासाहेबांना १९८७ मध्ये प्रदान करण्यात आले. हे पारितोषिक वारणा दूध संघाला अनेक अडचणीतून बाहेर काढून दूध संघाला चांगले दिवस हे तात्यासाहेब कोरे यांच्या जबर इच्छाशक्तीतून प्राप्त झाले. मध्यंतरी हा दूध संघ बंद पडण्याच्या अवस्थेत होता. पण दूध संघाची स्वत:ची विक्री व्यवस्था निर्माण केल्यामुळे तसेच वारणेचे दूध मुंबई येथे विक्री करण्यास सुरूवात केल्यामुळे हा दूध संघ कर्जातून बाहेर पडला. तसेच एक देशातील आदर्श संघ निर्माण झाला आहे. सन १९९२-९३ हे वर्ष दूधसंघाचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. या वर्षात एकूण सभासद संख्या 'अ' वर्ग १४६०७ इतकी झाली. तसेच 'ब' वर्ग सभासद संख्या १३३ इतकी झाली. आज ह्या दूध संघाची वार्षिक उलाढाल साखर कारखान्याइतकीच आहे. सुरूवातीच्या काळात म्हणजे सन १९६९-७० या काळात वार्षिक उलाढाल केवळ ९.५३ इतकी होती.

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, १९६९-७० ते १९७९-८० या काळात दूध संकलनात वाढ फारशी दिसून येत नाही. सुरूवातीच्या काळात केवळ शासकीय दूध संघाला वारणा दूध संघ दूध पुरवठा करीत होता. त्यामुळे वरील दहा वर्षांच्या काळात दूध संकलनात मोठा फरक दिसून येत नाही. शासकीय धोरणानुसार दूध बिले दिली जात होती. तसेच दूध बिलही वेळेवर मिळत नव्हते. त्यामुळे वारणा दूध संघाला दूध पुरवठा मोठ्या प्रमाणात होत नव्हता. पण १९८० नंतर मुंबई येथे स्वतंत्र रित्या दूध विक्री केंद्रे स्थापन करून धाडसी पाऊल टाकले. सुरूवातील अपना बझारच्या मदतीने

दूध विक्री सुरू केली. त्यानंतर हळूहळू दूध विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. संघ आर्थिकदृष्ट्या तोट्यात होता तो फायद्यात आला. बंद पडणारा दूध संघ आज देशातील एक आदर्श संघ आहे. कारण स्वतंत्र दूध विक्री केंद्र स्थापन केली त्याचा फायदा झाला. अडचणीच्या वेळी तात्यांनी आपल्या नेतृत्वाची कसब पणाला लावून ही विक्री मुंबईत यशस्वी केली. त्याचा फायदा दूध उत्पादकांना झाला. म्हणून १९८० नंतर मोठ्या प्रमाणात दूध संकलन झालेले दिसून येते. तसेच त्यानंतर मोठ्या प्रमाणात दूध पदार्थांची निर्मिती आणि विक्री सुरू केली म्हणून त्याचा फायदा वार्षिक उलाढालीत झाला.

सन १९९२-९३ या वर्षात वार्षिक उलाढाल ६८७३.३७ इतकी झाली. म्हणजे ही आकडेवारी साखर कारखान्याच्या उत्पादनाशी तुलना करता जवळपास तेवढीच आहे. वारणेची वार्षिक उलाढाल वाढण्याचे प्रमुख कारण म्हणजे वारणेचे काही पदार्थ आज संपूर्ण देशात गाजू लागले आहेत. स्कीम, मिल्क पावडर, आणि तुप निर्मितीला १९७६-७७ पासून सुरूवात केली तर श्रीखंडाला १९८३-८४ पासून सुरूवात केली आहे. त्याची आकडेवारी खाली दर्शविली आहे. ही आकडेवारी वर्षाला किती उत्पादन केले आहे हे समजून येते. आपल्या अभ्यासासाठी पाच वर्षांचा अभ्यास करून मिल्क पावडर, तुप, श्रीखंड यांचे उत्पादन किती टन झाले आहे हे दाखविण्यामागचा उद्देश आहे. अभ्यासासाठी सन १९८८-८९ ते १९९२-९३ या पाच वर्षांचे उत्पादन दाखविले आहे. हे उत्पादन मेट्रीक टनांत आहे. उत्पादनाचा आलेख पुढील पानावर दर्शविला आहे.

वरील आलेखात प्रत्येक वर्षाचा उत्पादनाचा आलेख दर्शविला आहे. तर त्यात पहिल्या स्तंभात स्कीम मिल्क पावडरीचे उत्पादन दाखविले आहेत. दुसऱ्या स्त्भात तूप उत्पादन दाखविले आहे तर तिसऱ्या स्तंभात श्रीखंड उत्पादन दाखविले आहे. असे १९८८-८९ ते १९९२-९३ सालाचा आढावा घेतला आहे. x अक्षावर वर्षे दाखविली आहेत तर y अक्षावर उत्पादन मेट्रिक टनांत दाखविले आहे.

तात्यासाहेब कोरे यांच्या नेतृत्त्वाखाली वारणा दूध संघ अनेक दूध उत्पादन पदार्थ बाजारपेठेत आणत होते व त्यांची विक्रीही मोठ्या प्रमाणात चालू होती. त्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. बंद पडणारा दूध संघ काही कठोर निर्णय घेऊन तात्यांनी अत्यंत यशस्वी करून दाखविला आहे. वारणा दूध संघ तर यशस्वी केलाच परंतु दूध संघाच्या माध्यमातून अनेक संस्थाही स्थापन केल्या व त्याही यशस्वी करून दाखविल्या. इतर संस्थांची मदत दूध संघाच्या कार्याला होऊ लागली. त्यामुळे दूध संघाची भरभराटी होऊ शकली. दूध संघामार्फत चालविल्या गेलेल्या कांही संस्था पुढील प्रमाणे

## १) सावित्री महिला औद्योगिक सहकारी संस्था :-

ग्रामीण सहकारामध्ये ही संस्था एक नवा प्रयोग म्हणून सन १९८४-८५ या वर्षात स्थापन केली. दूध संघाचे कर्मचाऱ्यांची पत्नी किंवा घरातील महिलांना सदस्य करून ही संस्था चालू केली. संस्थेच्या आज १५८३ इतक्या महिला सभासद असून ह्या संस्थेचे व्यवस्थापन महिलांमार्फतच पाहिले जाते. यामुळे वारणा दूध संघात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या किंवा भागातील गरजू महिलांना रोजगाराचे साधन मिळाले आहे. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांना काही अंशी रोजगार मिळू लागला. या संस्थेमार्फत प्लास्टिकच्या विविध वस्तुंचे उत्पादन केले जाते. दूध संघास आवश्यक असणाऱ्या श्रीखंड, कप व झाकण याबरोबरच कॅडबरी, ग्लॅस्को, चमचे इ. वस्तु ह्या संस्थेमार्फत तयार

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

केले जाते. तसेच पिठाची गिरणी, लॉन्ड्री यासारख्या सेवाही या संस्थेमार्फत चालविल्या जातात. या संस्थेची वार्षिक उलाढाल २.०० कोटी इतकी आहे.

**२) अमृत सेवक सहकारी पतसंस्था :-**

वारणा दूध संघामार्फत अमृत सेवक सहकारी पतसंस्था चालविली जाते. कामगारांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व त्यांना जीवनावश्यक वस्तू पुरविण्यासाठी ही पगारदार नोकरांची संस्था असून ह्या संस्थेमार्फत कर्जवाटप, प्रोव्हीजन स्टोअर्स, साखर खरेदी विक्री, दूध व दुग्धपदार्थांची विक्री इ. व्यवहार केले जातात. या संस्थेची वाशी, नेरूळ येथे शाखा आहे. कामगारांच्या पगाराच्या प्रमाणात क्रेडीटवर जास्तीत जास्त ५०,०००/- इतके कर्ज दिले जाते. या संस्थेची सभासद संख्या सध्या १५१४ इतकी आहे. या संस्थेची वार्षिक उलाढाला ८.३७ कोटी इतकी आहे.

**३) अमृत कामगार कल्याण क्रीडा मंडळ :-**

या मंडळामार्फत कर्मचाऱ्यांच्या मुलांना शालेय क्रमिक पुस्तके, वह्यांचे मोफत वाटप करण्यात येते. तसेच मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत दिली जाते. मंडळामार्फत विविध क्रिडा स्पर्धा, रक्तदान शिब्रीरे असे विविध उपक्रम राबविण्यात येतात.

**४) अमृत भगिनी मंडळ :-**

दूध संघासाठी आवश्यक असणाऱ्या पॅकिंगसाठी पॉलिथिन फिल्मचा पुरवठा संघास केला जातो. या संस्थेमार्फत अंगणवाड्या व बालवाड्यांना सकस आहाराचा पुरवठा केला जातो. संस्थेची सभासद संख्या १३९५ इतकी असून या संस्थेची वार्षिक उलाढाल अडीच कोटी रूपयांची आहे. या संस्थेमार्फत उत्पादित होणाऱ्या वस्तुंची क्वॉलिटी अत्यंत चांगली असून त्याच्या मागणीत वाढ आहे.

वरील संस्थांशिवाय सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे -

## ५) तात्यासाहेब कोरे सहकारी दूध-साखर वाहतूक संस्था :-

वारणा विभागात अनेक वस्तूंचे उत्पादन होते. तसेच उत्पादन करण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता असते. त्याची वाहतूक व्यवस्थित होण्यासाठी तात्यासाहेबांच्या नावाने ही संस्था स्थापन केली आहे. दूध सोसायट्यांवर संकलन होणारे दूध संघावर आणणे, तसेच त्याच्यावर प्रक्रिया केल्यानंतर ते निरनिराळ्या ठिकाणी पोहोच करण्याची कामे या वाहतूक संस्थेवर आहेत. दूध हे नाशवंत असल्यामुळे त्याची वाहतूक जलद करण्याची गरज असते. या संस्थेकडे लहान-मोठ्या मिळून १२० गाड्या आहेत. या संस्थेची वार्षिक उलाढाल ७ कोटी इतकी आहे. या संस्थेला वेळेचे बंधन फार महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे वारणा दूध संघाच्या नेतृत्त्वाखाली इतर काही छोट्या-मोठ्या संस्था तात्यासाहेबांनी स्थापन केल्या आहे. विशेषत: महिलांसाठी उद्योग मिळाले आहेत. त्यामुळे वारणा परिसरातील ग्रामीण स्त्रियांना रोजगार मिळाला. तसेच दूध उत्पादनापासून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अशी अनेक कुटूंबे सुखाचे जीवन जगू लागली आहेत.

## सारांश :-

तात्यासाहेब कोरे यांनी वारणा परिसरात अनेक उद्योगधंदे स्थापन केले. प्रत्येक प्रकल्प यशस्वी झाला आहे. पण दूधसंघ म्हणजे तात्यांच्या कार्याचा कळस आहे. याचे कारण म्हणजे ही संस्था उद्दिष्टपूर्तीमध्ये १०० टक्के यशस्वी झाली आहे. तसेच वारणेची दूध क्षेत्रातील उत्पादने सर्व भारतभर प्रसिद्ध झाली आहेत. तात्यांचा दूधसंघ स्थापनेमागचा मुख्य उद्देश म्हणजे वारणा परिसरातील बागायती व जिरायती शेतकऱ्यांना आपल्या दैनंदिन जीवनात सुखाचे दिवस यावेत हा होता. तो उद्देश यशस्वी झाला आहे.

जगप्रसिद्ध असा आनंद दूध आहे. त्याच्या धर्तीवर हा संघ स्थापन केला. आज वारणेचे दहा दुग्ध पदार्थ बाजारपेठेत आहेत. वारणा दूध संघामुळे वारणेच्या ग्रामीण परिसरात धवलक्रांती झाली आहे. अनेकांना रोजगार मिळू लागले, अनेक कुटूंबे चांगल्या पद्धतीने जीवन जगू लागली आहेत. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा मोठ्या प्रमाणात झाला. १३ डिसेंबर १९९४ ला तात्यासाहेब आपल्यातून निघून गेले. तोपर्यंत त्यांनी दूध संघाच्या हिताचा विचार केला म्हणूनच दूध संघ यशस्वी झाला.

## संदर्भ

१) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे षष्ठ्यद्विपूर्ती समारंभ समिती", १ डिसेंबर, १९७४, पृष्ठ क्र. २५५.

२) डॉ. आर. डी. शिंगटे : "अमृतमहोत्सव स्मरणिका", मे, १९९०, पृष्ठ २०.

३) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती", मे, १९९०, पृष्ठ क्र. १३३.

४) दे. भ. पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार : "अमृतमहोत्सव स्मरणिका", मे, १९९०, पृष्ठ ८.

५) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती.", मे, १९९० पृष्ठ क्र. १३४.

६) "मी एक कार्यकर्ता : तात्यासाहेब कोरे अमृतमहोत्सव समिती", मे, १९९० पृष्ठ क्र. १४०.

७) "वार्षिक अहवाल वारणा दूध संघ, १९८५-८६", पृष्ठ क्र. ९.

८) "वार्षिक अहवाल वारणा दूध संघ, १९९२-९३", पृष्ठ क्र. २.

※※※※